N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** मोधा **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0250 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/07/2023 23:43 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 19/07/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/07/2023

**Time From (वेळेपासून):** 15:27 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:27 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/07/2023 **Time (वेळ):** 23:22 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 054 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/07/2023 23:22 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** डाआंबेडकर , सामाजिक न्याय भवन, साहित्य रत,लोकशाहीर अण्णा भाऊ साठे ,विकास म कार्यालयाच्या परभणी

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सतीश तुकाराम मस्के

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खानापुर फाटा, परभणी,परभणी,मोधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खानापुर फाटा, परभणी,परभणी,मोधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9673965516

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री चंदु किशनराव साठे | | | 1. वेदांत नगर, मालेगाव रोड,,नांदेड,नांदेड, महाराष्ट्र,भारत |
| 2 | अविनाश प्रकाश मुराळकर | | | 1. विष्णुनगर, हमालपुरा, नांदेड,मोधा, परभणी,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,00/ रू दराच्या 10 भारतीय चलनी नोटा | 5,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 5,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 19.07.2023
फिर्याद

मी सतीश तुकाराम मस्के, वय 28 वर्षे, व्यवसाय अॅटो चालक, रा. खानापुर फाटा, ता. जिल्हा परभणी. मो. क्रं. 9673965516 समक्ष पोलीस स्टेशन नवामोंढा, परभणी येथे फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणार असुन अॅटो चालवुन आपली उपजिवीका भागवितो. मी अॅन्टी करप्षन ब्युरो परभणी येथे दिनांक 18.07.2023 रोजी तक्रार दिली की, मी सतीष तुकाराम मस्के रा. खानापुर फाटा, ता. जिल्हा परभणी येथे राहत असुन अॅटो चालवुन उपजिवीका भागवितो. माझी मावस आत्या नामे श्रीमती यमुना उत्तम घोडे वय 43 वर्षे राहणार पाचेगांव ता. जिंतुर जिल्हा परभणी येथे राहणारी असुन तीस लिहीता वाचता येत नाही. त्यामुळे मी अधुन मधुन माझ्या आत्याचे काम करुन देत असतो.
माझी मावस आत्या नामे श्रीमती यमुना उत्तम घोडे वय 43 वर्षे राहणार पाचेगांव ता. जिंतुर जिल्हा परभणी हीस दिनांक 23/03/2023 रोजी साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यांच्या कार्यालयकडुन मंडप डेकोरेशन या व्यवसायाकरीता 1,00,000/- रुपये कर्ज मंजुर झाले आहे. त्यामुळे मी व माझी आत्या यमुना घोडे ह्या दिनांक 13/07/2023 रोजी साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), परभणी येथील ऑफीसमध्ये गेलो होतो. त्यावेळी साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), परभणी येथील श्री साठे साहेब यांनी माझ्या आत्यास 1,00,000/- रुपये कर्ज मंजुरीचा चेक देण्यासाठी 5,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. तसेच त्याच कार्यालयातील क्लर्क अविनाश यांनी सुध्दा चेकच्या कामासाठी पैसे द्यावे लागतात असे म्हणुन लाचेची मागणी केलेली आहे.
कर्ज मंजुरीचा चेक देण्यासाठी कोणालाही पैसे देण्याची गरज नाही परंतु आम्ही श्री साठे यांना पैसे दिले नाही तर ते मंडप डेकोरेशन साठी मंजुर झालेल्या कर्जाची रक्क्म मिळवुन देणार नाहीत यासाठी आम्ही श्री साठे साहेब यांना नाईलास्तव होकार देवुन मी आपणाकडे तक्रार देण्यासाठी आलो आहे. साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), परभणी येथील श्री साठे साहेब यांचा माझेशी यापुर्वी

कोणत्याही प्रकारचा आर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार नाही तसेच त्यांची व माझी दुष्मनी नाही.
मी माझ्या तक्रारी सोबत माझी मावस आत्या यमुना घोडे यांचे नावे साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यांचेकडुन कर्ज मंजुर झालेल्या आदेषाची छायांकित प्रत व आधार कार्ड ची छायांकित प्रत या सोबत सादर करत आहे.
मी व माझी आत्या यमुना घोडे असे साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), अंतर्गत मंडप डेकोरेशन साठी मंजुर झालेल्या कर्जाच्या चेक संदर्भात साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), परभणी येथील श्री साठे साहेब यांना आज दिनांक 18/07/2023 रोजी प्रत्यक्ष जावुन भेटणार आहोत भेटी दरम्यान श्री साठे साहेब यांनी मला किंवा माझी आत्या यमुना घोडे हीस तीच्या कर्जाच्या चेक संदर्भात स्वतः अगर इतरांमार्फत लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी.
मी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस निरीक्षक श्री. वाघमारे एसीबी, परभणी यांनी तात्काळ दोन पंच नामे 1) श्रीमती संगिता अनिरूध्द गोरे वय 30 वर्षे व्यवसाय वाहक बिल्ला क्रमांक 22051 रा.प.म परभणी आगार रा.कपील नगर, कारेगाव रोड, परभणी, 2) श्री शिवकांत नरहरी केंद्रे वय 36 वर्षे व्यवसाय वाहक बिल्ला क्रमांक 20890 रा.प.म. परभणी आगार रा. माधव नगर, गंगाखेड रोड, परभणी यांना ए.सी.बी. कार्यालय, परभणी येथे बोलावुन घेवुन त्यांची व माझी ओळख करून दिली. त्यांना मी माझी तक्रार तोंडी कथन केली. माझी हस्तलिखीत तक्रार पोनि श्री वाघमारे यांनी पंचांना वाचण्यास दिली. दोन्ही पंचांनी माझी तकार वाचून त्या तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघमारे साहेब यांचे सुचनेवरुन पोलीस हवालदार निलपत्रेवार यांनी येथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये वक्तव्य ध्वनिमुर्दीत केले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या गळयात लटकावुन देवुन मला पंच क्र.01 श्रीमती संगिता गोरे यांचे सह माझी मोटारसायकल क्रमांक एम एच 22 जी 6656 ने श्री साठे व क्लर्क अविनाश यांची भेट घेवुन पडताळणी करण्यासाठी रवाना केले. मी व पंच श्रीमती गोरे परभणी येथील जायकवाडी वसाहतीतील साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), परभणी कार्यालया जवळ पोहचलो त्यावेळी तेथे माझी आत्या नामे यमुना घोडे ही ए.सी.बी. चे नागरगोजे साहेब यांचे सोबत त्यांचे मोटारसायकलवर तेथे आली, त्यानंतर मी, पंच श्रीमती गोरे व माझी आत्या यमुना घोडे असे साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), परभणी कार्यालयात गेलो. तेथे क्लर्क अविनाश साहेब होते मी त्यांना साठे साहेब कुठे आहेत असे विचारले, त्यावेळी त्यांनी सांगितले की, साठे साहेब डी.एल.सी. मिटींगसाठी कलेक्टर ऑफीसला गेलेले आहेत. मिटींग संपल्यावर ते तिकडुनच तिकडे घरी जाणार आहेत. त्यानंतर मी त्यांना आत्याच्या फाईल मधील हमीपत्राच्या कागदाबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, साहेबांची सही लागते, साहेब नाहीत, तुम्ही उद्या या, असे म्हणाले म्हणुन मी, पंच व आत्या असे ए.सी.बी. कार्यालयात परत आलोत. त्यानंतर दि.19/07/2023 रोजी पुन्हा पडताळणी कार्यवाही करायचे ठरविण्यात आले. त्यानंतर पडताळणी स्थगिती पंचनामा करण्यात आला व आम्हाला दि.19/07/2023 रोजी ए.सी.बी. कार्यालयात सकाळी 10:30 वाजता येण्यास सांगण्यात आले.
दि.19/07/2023 रोजी मी व माझी आत्या यमुना घोडे एसीबी कार्यालयात हजर आलोत. कार्यालयात दोन्हीही पंच उपस्थित होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघमारे साहेब यांचे सुचनेनुसार पोलीस हवालदार निलपत्रेवार यांनी पुर्वीप्रमाणे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवुन आमचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या गळयात लटकावुन देवुन मला पंच क्र.01 श्रीमती संगिता गोरे यांचे सह माझी मोटारसायकल क्रमांक एम एच 22 जी 6656 ने श्री साठे व क्लर्क अविनाश यांची भेट घेवुन पडताळणी करण्यासाठी रवाना केले. मी व पंच श्रीमती गोरे परभणी येथील जायकवाडी वसाहतीतील साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), परभणी कार्यालया जवळ पोहचलो त्यावेळी तेथे माझी आत्या नामे यमुना घोडे ही ए.सी.बी. चे नागरगोजे साहेब यांचे सोबत त्यांचे मोटारसायकलवर तेथे आली, त्यानंतर मी, पंच श्रीमती गोरे व माझी आत्या यमुना घोडे असे साहित्य रत्न लोकषाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), परभणी कार्यालयात गेल्यानंतर श्री साठे साहेब यांच्या कॅबीनमध्ये गेलो त्यावेळी साठे साहेब यांनी मला झेरॉक्स काढुन आणण्यासाठी बाहेर पाठविले. त्यावेळी कॅबीनमध्ये माझी आत्या व पंच गोरे मॅडम या थांबुन होत्या. मी झेरॉक्स काढुन आल्यानंतर आत्यानी मला साहेब कर्जाचा चेक देण्यासाठी पैषाच बोलुन 10,000/- रुपये पंचासमक्ष लाच मागितली आहे असे सांगितले. त्यानंतर मी साठे साहेबांना काहीतरी कमी करा म्हणुन विनंती करु लागलो, त्यावेळी त्यांनी मी पैशाच तुझ्या आत्याला बोललेलो आहे असे म्हणाले, त्यांच्या कॅबीन मध्ये क्लर्क अविनाश आले, साठे साहेब यांनी क्लर्क अविनाशला म्हणाले की, मी आठ दिवसापुर्वीच बाईला पैशाच बोललो होतो, तिने तिच्या भाच्याला आणले आहे, मध्यस्थी म्हणुन, त्यावेळी क्लर्क अविनाश हा म्हणाला की, मी सुध्दा यांना सांगितले होते.
त्यानंतर मी क्लर्क अविनाश यांना साठे साहेब यांना सांगुन काहीतरी कमी करा अशी विनंती केली. त्यावेळी क्लर्क अविनाश हे साठे साहेब यांच्या कॅबिनमध्ये जावुन बाहेर आले व मला म्हणाले की, साहेबांनी 10,000/- रुपये सांगितले आहेत. त्यावेळी मी त्यांना विनंती करुन काहीतरी कमी करा मी 5,000/- रुपये देतो असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी 'बर ठिक आहे, पाच वाजता ये' असे म्हणाले, त्यानंतर मी, पंच व माझी आत्या असे एसीबी कार्यालयात परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक वाघमारे साहेब यांनी मला व पंच गोरे यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारले, त्यावेळी मी त्यांना वरील प्रमाणे हकीकत सांगितली. त्यावेळी पंच गोरे मॅडम यांनी सांगितले की, साठे साहेब यांनी मला झेरॉक्स काढण्यासाठी पाठविल्यानंतर त्यांचे समक्ष श्री साठे साहेब यांनी माझ्या आत्याला चेकच्या कामासाठी 10,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. त्यानंतर सापळा पथकाने डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये पडताळणी कार्यवाही दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. पंच श्रीमती गोरे यांचे समक्ष श्री साठे साहेब यांनी माझ्या आत्यास 10,000/- रुपये लाचेची मागणी केली व क्लर्क अविनाश यांनी सुध्दा श्री साठे साहेब यांचे सांगण्यावरुन 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोड अंती 5,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने श्री साठे व क्लर्क अविनाश यांचेवर सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.
त्यानंतर पोनि श्री वाघमारे यांचे सुचनेनुसार एसीबी कार्यालय परभणी येथे सापळा कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली. सापळा कार्यवाही मधील पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सुचना देण्यात आल्या. पोशि/शेख मुक्तार यांनी मला व पंचाना अॅंथ्रॉसिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट लॅम्पचे गुणधर्म व वापरा बाबत माहिती देवुन प्रात्यक्षीक करून दाखविले. त्यानंतर माझ्या जवळील 5,000/- रुपये (ज्यामध्ये 5,00/- रू दराच्या 10 भारतीय चलनी नोटा) मी पोनि श्री वाघमारे साहेब यांचेकडे जमा केले. त्यानंतर मी जमा केलेल्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन घेतले, त्यावर पंचांनी व वाघमारे साहेब यांनी सहया केल्या. त्यानंतर लाचेच्या रक्कमेस पोशि/शंख मुक्तार यांनी अॅन्थ्राॅसीन पावडर लावून माझे अंगावरील शर्टच्या छातीवरील डाव्या बाजूचे खिशात व्यवस्थीत ठेवून दिली. त्यानंतर श्री साठे साहेब व क्लर्क अविनाश यांना भेटुन लाचेची रक्कम देण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या गळयात व्यवस्थित लटकावुन देवुन मला व पंच क्र.02 केंद्रे यांना माझ्याजवळील मोटारसायकलने जायकवाडी वसाहतीतील साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), परभणी कार्यालयाकडे रवाना केले. आमचे पाठोपाठ एसीबीचे सापळा पथक हे शासकीय वाहनाने रवाना झाले. मी व पंच क्र.02 केंद्रे असे जायकवाडी वसाहतीतील साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), परभणी कार्यालयात गेलो तेथे माझी व क्लर्क अविनाश यांची पंचासमक्ष भेट झाली. ते उठुन ऑफीसच्या वरांडयात आले. क्लर्क अविनाश यांनी मला पैषाची मागणी केली, मी त्यांना

लाचेची रक्कम 5,000/- रुपये दिली ती त्यांनी त्यांच्या अंगावरील जिन्स पॅंटच्या पाठीमागील डावे बाजुच्या खिशामध्ये ठेवली त्यानंतर मी क्लर्क अविनाश यांना काम लवकर करुन टाका अशी विनंती करुन साठे साहेब यांचेकडे चला म्हणुन घेवुन गेलो, तेंव्हा साठे साहेब यांनी मला काही व्यवस्थित बोलेले नाहीत. कारण त्यांचे कॅबीनमध्ये इतर व्यक्ती होते ते मला इतर अवांतर गोष्टी बोलेले. त्यानंतर मी ऑफीसच्या बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अशा रितीने लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर लागलीच सापळा पथकाने श्री साठे साहेब व क्लर्क अविनाश यांना ताब्यात घेतले त्यानंतर पंचासमक्ष क्लर्क अविनाश यांचेकडुन लाचेची 5,000/- रुपये रक्कम ताब्यात घेतली व माझेकडील व्हाईस रेकॉर्डर 15○:27 वाजता काढुन बंद केले. त्यानंतर कॅबीनमध्ये कृत्रिम अंधार करुन पंचासमक्ष लाचेच्या नोटांवर अट्राव्हायोलेट लाईटचा प्रकाष टाकुन पाहिले असता नोटांवर हिरवट चकाकी दिसुन आली. नोटांचे नंबर पंच श्रीमती गोरे यांच्या मार्फत चेक के○ले त्या लाचेच्या नोटा असल्याची खात्री झाली. सदर कार्यवाहीचा सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा करण्यात आला आहे.
सीसीटीएनएस प्रणालीमध्ये 8000 अक्षरांची मर्यादा असल्याने उर्वरीत फिर्याद कागदोपत्री समाविष्ट करीत आहोत.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** **(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** subhash lachamanna anmulwar(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Satish

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** subhash lachamanna anmulw

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

(सीसीटीएनएस प्रणालीमध्ये 8000 अक्षरांची मर्यादा असल्या कारणाने उर्वरीत फिर्याद ही पुढीलप्रमाणे कागदोपत्री समाविष्ट करण्यात येत आहे.)

1) श्री चंदु किशनराव साठे वय 57 वर्श व्यवसाय नौकरी जिल्हा व्यवस्थापक साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), परभणी, रा.वेदांत नगर, मालेगाव रोड, नांदेड 2) अविनाष प्रकाष मुराळकर वय 34 वर्श व्यवसाय नौकरी बाहयस्त्रोत लिपीक टंकलेखक साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), परभणी रा.विष्णुनगर, हमालपुरा, नांदेड यांनी माझी आत्या नामे यमुना घोडे हिस साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यांचे कार्यालयातुन मंडप डेकोरेशन व्यवसायाकरीता मंजुर झालेल्या 1,00,000/- रुपये कर्ज मंजुरीचा चेक देण्यासाठी पंचासमक्ष 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 5,000/- रुपये लाच रक्कम क्लर्क अविनाश यांनी पंचासमक्ष स्विकारली, म्हणुन माझी वरील दोघांविरुद्ध कायदेशिर फिर्याद आहे.

माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे एसीबी कार्यालय परभणी येथील संगणकावर मराठीत टंकलिखीत केली. त्याची प्रिंट काढून मला वाचावयास दिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**ही फिर्याद दिली सही**

Satish